वयोवृद्धः मनोयुवा

**महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई**

संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२
कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.



# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

वर्ष-३१ | अंक-१० | ऑक्टोबर २०२३



## सर्व भारतीयांसाठी अभिमानास्पद क्षण

इस्रोच्या चांद्रयान-३ मोहिमेत सहभागी झालेल्या
सर्व शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी यांचे
तमाम ज्येष्ठ नागरिकांचे वतीने हार्दिक अभिनंदन..!



## श्री. दामोदर सेवकराम पवार ?

पत्ता : गाडगे शासकीय तंत्रनिकेतन कॉलेज समोरील गल्ली, मु. पो. जि. अमरावती.

जन्मतारीख : ३०/०४/१९६० मोबा. : ९४२३६२१६४२

सध्या : सरचिटणीस, राज्य कर्मचारी मध्यवर्ती संघटना, अमरावती
सरचिटणीस, म.रा.हिवताप व हत्तीरोग कर्मचारी मध्यवर्ती संघटना, राज्य शाखा
अध्यक्ष, स्वास्थ्य सेवा हिवताप सेवकांची सहकारी पतसंस्था, अमरावती
सचिव, तेजस्विनी सहकारी गृहनिर्माण संस्था, अमरावती.

---

## * फेस्कॉमच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील सत्कारमुर्ती *



श्री. श्यामसुंदर पाटील यांची यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांनी परीक्षक म्हणून निवड केलेबद्दल



सांगली प्रादेशिक विभागाचे यशवंतराव जगताप यांचा ओळखपत्र व उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार



लासलगाव येथील सुरेश पवार यांची संपर्क सचिव व हितचिंतक सभासद झालेबद्दल सत्कार



पुणे प्रादेशिक विभागाचे कायदेशीर सल्लागार ॲड. राजेंद्र दीक्षित यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार



सामाजिक संस्था (भवन) चे अध्यक्ष ना. ना. इंगळे यांनी राज्यातील पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षित केलेबद्दल सत्कार



विदर्भ पश्चिमचे अध्यक्ष व पदाधिकारी यांनी प्रादेशिकचे अधिवेशन उत्कृष्ट पार पाडलेबद्दल सत्कार



फेस्कॉमचे उपाध्यक्ष आण्णासाहेब टेकाळे यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल सत्कार

श्री. आर.ए. देसाई, सचिव
फेस्कॉम, प्रादेशिक विभाग सांगली
मोबा.नं. ८०८०७२५३५३

## महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे उद्दिष्ट व कार्य (जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त)

आज देशात/राज्यात विविध संघटना विशिष्ट कारणास्तव गठीत झाल्या आहेत. प्रत्येक संघटना गठीत करीत असतांना विविध धोरण व ध्येय ठरविलेले असते. याच पध्दतीने महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ अर्थात फेस्कॉम या संघटनेची निर्मिती झाली. सदर संघटना/ महासंघाचे ध्येय व धोरण 'ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्य' करणेचे ठरविणेत आले आहे. आज देखील अंगीकृत धोरणानुसार हा महासंघ फक्त ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यरत आहे.

ज्येष्ठ नागरिकासाठी कार्य याचा थोडक्यात इतिहास देखील विचारणीय आहे. डोंबिवली परिसरात साधारण ३५ चे जवळपास वयातील डॉ.राधाकृष्ण भट यांचे वास्तव्य होते. वय ३५ चे म्हणजेच अगदीच तरुण वयात त्यांना ज्येष्ठांच्या छळाची, उर्वरित जीवनाची, आरोग्याची जाणीव झाली. काही ज्येष्ठांच्या व्यथा अगदी जवळून जाणून घेतल्या. ज्येष्ठांसाठी काहीतरी केले पाहिजे ही भावना त्यांच्या मनी निर्माण झाली आणि भावनेतूनच त्यांनी पहिला ज्येष्ठ नागरिक संघ डोंबिवली येथे स्थापन केला. ज्येष्ठांची सर्वतोपरी सेवा त्यांनी सुरु केली. डोंबिवली बरोबरच इतरत्र, जवळपास आणखी काही ज्येष्ठ नागरीक संघ गठीत केले आणि दि.१२ डिसेंबर १९८० रोजी त्यांनी महासंघाची स्थापना केली.

भारताच्या संविधानातील कलम ३९ व ४१अ मध्ये ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाची वागणुक द्यावी, त्यांचे उर्वरित आयुष्याची सायंकाळ आनंदी जावी असा प्रयत्न केला जावा अशी तरतूद आहे. या तरतुदींच्या अभ्यासासह डॉ.राधाकृष्ण भट यांनी ज्येष्ठांचा प्रश्न युनोमध्ये नेला. जगाची वाढती लोकसंख्या आणि त्यामधील ज्येष्ठांच्या संख्येवर विचार करुन युनोने ज्येष्ठांच्या प्रश्नावर भर दिला. त्यावेळी जगात ९०० कोटी लोकसंख्येत ९० ते ९५ कोटी ज्येष्ठ नागरिकांची संख्या होती. यानंतर ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नावर वाचा फोडणेसाठी विविध संस्था निर्माण झाल्या.

याच दरम्यान महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाची स्थापना दि.१२/१२/१९८० रोजी झाली. त्यावेळी फेस्कॉमची अंगीकृत उद्दिष्ट्ये, ध्येय धोरणे, व्हिजन ठरविणेत आली. हे व्हिजन पूर्णत्वास नेणेचे आज अखेर फेस्कॉम प्रयत्नशील आहे. यामध्ये प्रमुख अंगीकृत उद्दिष्ट– **महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांच्या आणि त्यांच्या संघाच्या समग्र कल्याणकारी उपक्रमाचे एका नेतृत्वाखाली एकीकरण व सुदृढीकरण करणे आणि ज्येष्ठांचे बहुमोल ज्ञान, प्रगाढ अनुभव, प्रगल्भता, चैतन्य आणि कौशल्य यांचा एकूण समाजाच्या विशेषत्वाने ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी उपयोग करुन घेणे ठरले.**

याअंतर्गत समाजातील आदिवासी क्षेत्राबरोबरच तळागाळातील वृध्दांचे जीवन सुसह्य करणे, महिलांचे विशेषतः निराधार व विधवांचे सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविणे, ज्येष्ठांचे विरंगुळा केंद्र हे विरंगुळा केंद्र न राहता समाज मंदिराचे रुपाने जातीय सलोखा, एकजुट व राष्ट्रीय एकात्मता वाढविणारे केंद्र असावे, समाजातील गरीब, दिनदलीत, गरजू, पिडीत नागरिकांना मदतीचा हात पुढे करणे वगैरे ध्येयांनी प्रेरीत होवून आपला देश प्रगतशील व्हावा असा प्रयत्न फेस्कॉमने सुरु ठेवला आहे.

डॉ.राधाकृष्ण भट यांनी ज्येष्ठांचा प्रश्न युनोमध्ये नेलेनंतरच युनोने प्रामुख्याने ज्येष्ठासाठी प्रत्येक देशाने धोरण ठरवावे असे स्पष्ट केले वा अंतर्गतच जागतिक पातळीवर खालील दिवस ते विशेष दिन पाळावेत असे संमत केले.

१) ८ मार्च – जागतिक महिला दिन
२) १५ जून – ज्येष्ठांप्रती दुर्व्यवहार नियंत्रण दिन
३) २१ सप्टेंबर – स्मृतीभ्रंश दिन (अल्झायमर/डिमेन्शिया)
४) १ आक्टोबर – जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन.

युनोने सुचित केलेनुसार भारत सरकारने १९९९ मध्ये ज्येष्ठ नागरिक धोरण मंजूर केले. प्रत्येक राज्यांनी ज्येष्ठ नागरिक धोरण ठरवावे असे केंद्राने आदेशित केले. त्यानुसार महाराष्ट्राने दि.१४ जून २००४ ला ज्येष्ठांचे धोरण ठरविले. धोरण ठरविले मात्र त्यांची अंमलबजावणी योग्यरित्या होत नसलेने दि.९ जुलै २०१८ रोजी राज्याने सर्वसमावेशक धोरणाची अंमलबजावणी करावी असे आदेशित केले. यामध्ये प्रामुख्याने आर्थिक सुरक्षा, आरोग्य व पोषण आहार, निवारा, शिक्षण, जीवन व मालमत्तेचे संरक्षण, विविध शासकीय विभागांची जबाबदारी, अशासकीय संस्थांची जबाबदारी, संशोधन मनुष्यबळ, शिक्षण वगैरे बाबींचा अंतर्भाव केला.

या धोरण अंमलबजावणीचा पाठपुरावा फेस्कॉम अंतर्गत ३६ जिल्ह्यातील १२ प्रादेशिक विभागातील जवळजवळ ५००० ज्येष्ठ नागरिक संघ करीत आहेत. ज्येष्ठांकडे ज्ञान, अनुभव, परिपक्वता व उपलब्ध वेळ असून प्रत्येक कुटुंबासाठी, समाजासाठी, देशासाठी ''राष्ट्रीय संपत्तीचा'' उपयोग फेस्कॉम करुन घेत आहे. ज्येष्ठ नागरिक सध्या एकाकी व अडगळीची वस्तु समजली जात असून त्यांना मानसिक पाठबळ देणेचे व त्यांना समाजात सामावून घेणेचा प्रयत्न फेस्कॉम ज्येष्ठ नागरिक संघाद्वारा करीत आहे. ज्येष्ठांचे छळाचे प्रमाण कमी होऊन त्यांच्या निवाऱ्याची, आहारांची सोय पाल्यांनी योग्यरित्या करावी यासाठी फेस्कॉम प्रयत्नशील आहे. ''आईवडील व ज्येष्ठ नागरिक चरितार्थ कल्याणकारी कायदा २००७, नियम २०१०'' या कायद्याचा प्रचार व प्रसार विविध विद्यापिठे, महाविद्यालये यांच्या सहकार्याने करीत आहे. नवतरुणांना या कायद्याची अधिकाधिक माहिती होवून ज्येष्ठांच्या छळाचे प्रमाण त्याचबरोबर कोर्टातील प्रकरणे कमी व्हावीत असा प्रयत्न ज्येष्ठ नागरिक संघाद्वारा फेस्कॉम करीत आहे.

आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या ज्येष्ठांना दोन वेळच्या जेवणाची भ्रांत पडू नये यासाठी शासकीय पेन्शन योजनेचा प्रचार व प्रसार करुन पात्र ज्येष्ठ नागरिकांना आर्थिक लाभ मिळवून देणेचा फेस्कॉम प्रयत्न करीत आहे.

ज्येष्ठांसाठी सर्वतोपरी मदत व प्रयत्न करणाऱ्या फेस्कॉमचे अंगीकृत उद्दिष्ट्य- व्हिजन पूर्णत्वास नेणेसाठी राज्यातील ४०७५१ गावात ज्येष्ठांच्या उन्नतीसाठी कार्य करणेसाठी ज्येष्ठ नागरिक संघांची आवश्यकता असून ''गाव तेथे ज्येष्ठ नागरिक संघ'' चा नारा देवून फेस्कॉम प्रयत्न करीत आहे. जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन १ ऑक्टोबर या दिनाचे औचित्य साधून १२ प्रादेशिक विभागाचे, ३६ जिल्ह्याचे अध्यक्ष व कार्यकारीणी बरोबरच प्रत्येक गावचे सामाजिक कार्यकर्त्यांनी विशेष प्रयत्न करुन ४०७५१ गावात/ वाड्यात/ वॉर्डात ''ज्येष्ठ नागरिक संघ'' गठीत करुन ज्येष्ठ नागरिकांचे जीवन प्रकाशमय करावे असे आवाहन करावेसे वाटते.

***

**ऑक्टोबर महिन्यातील 'दिन' विशेष -**

दि. १ ऑक्टोबर – ज्येष्ठ नागरिक दिन, रक्तदान दिन
दि. ८ ऑक्टोबर – वायुसेना दिन
दि. ९ ऑक्टोबर – टपाल दिन
दि. ३० ऑक्टोबर – बचत दिन

**दि. १ ऑक्टोबर – ज्येष्ठ नागरिक दिनाच्या सर्व ज्येष्ठ नागरिकांना फेस्कॉम तर्फे हार्दिक शुभेच्छा..!**




गोवा हिंदी अकादमी व विद्यार्थी विकास अकादमी महाराष्ट्र चे वतीने छत्रपती शाहूमहाराज समाजरत्न सन्मान २०२३ पुरस्कार स्वीकारताना सोमनाथ गवस (चंदगड)



झरे (सांगली) येथील वार्षिक सर्वसाधारण सभेत अती ज्येष्ठ नागरिक श्री. शामराव रामा चावरे (वय १०१) यांचा सत्कार



झरे (सांगली) येथील ८० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ महिला प्रभावती महादेव सादिलगे यांचा सत्कार



मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित आरोग्य शिबीराप्रसंगी संध्याछाया वृध्दाश्रम संस्था व उत्तर मराठवाडा प्रादेशिकचे पदाधिकारी



खानापूर तालुक्यातील बानूरगड आधार ज्येष्ठ नागरिक संघाचा नवीन प्रस्ताव फेस्कॉम अध्यक्ष यांना सादर करताना अध्यक्ष व पदाधिकारी




समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ, सोलापूर येथील कार्यक्रम प्रसंगी पदाधिकारी



श्रीराम ज्येष्ठ नागरिक संघ, खानापूर फेस्कॉमचे संलग्नता प्रमाणपत्र स्वीकारताना अध्यक्ष व पदाधिकारी




आनंदयात्री ज्येष्ठ नागरिक फौंडेशन, कर्नाळ येथे मार्गदर्शन करताना अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा. संजय ठिगळे

Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732
Postal Licence Reg. No. : SGL/133/2021-2023



ऐरोली (मुंबई) संघाचे पदाधिकारी मा. अध्यक्ष यांचे हस्ते गौरव स्वीकारताना




उमरखेड येथील औदुंबर ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यक्रम प्रसंगी पदाधिकारी



हरिपूर येथील कृष्णामाई महिला संघाचे माता व बालक शिबीर प्रसंगी ज्येष्ठ महिला व पदाधिकारी



धुळे येथील महाराजा अग्रसेन ज्येष्ठ नागरिक संघाद्वारा वृक्षारोपण प्रसंगी



पश्चिम विदर्भ प्रादेशिक विभागाचे वतीने जीवन गौरव पुरस्कार स्वीकारताना सौ. व श्री. ना. ना. इंगळे



महाराष्ट्र राज्याचे मंत्री मा.ना. मंगलप्रसाद लोढा यांचे हस्ते सन्मानित होताना सुरेश पोटे

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐ /पत्ता सोडून गेले ☐ /पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :

**श्री. अंजुमन खान**

फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४

**PRINTED MATTER**

प्रति,

____________________

____________________

____________________